# बहिणाबाई चौधरी यांचे लौकिक चरित्रय व काव्य

प्रा. डॉ. अनंत वराडे
दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य
महाविद्यालय मलकापुर जि.बुलडाणा

बहिणाबाई चौधरी यांची ओळख अनेक साहित्यिकांना आहे. तसेच महाराष्ट्रातील अनेक रसिकांना आहे. त्यांचा जन्म जळगांव जिल्हयातील 'आसोदा ' या गावात दि. १६ ऑगस्ट १८८० मध्ये झाला.त्या दिवशी नागपंचमीचा दिवस होता. बहिणाबाईंच्या वडिलांचे नाव उखाजी महाजन असून आईचे नाव भिमाबाई होते. जळगांव व असोदा यांचे अंतर फार जास्त नव्हते माहेर जवळच त्यांना सासर मिळालं. त्यांचा विवाह नथ्थुजी खंडेराव चौधरी यांच्याशी झाला. त्यांच्या घरची परिस्थिती खाऊन पिऊन बरी होती. त्यांना खटल्याच घर मिळाल. त्यांचा विवाह लहानणीच ठरला व वयाच्या १३व्या वर्षी त्यांचा विवाह झाला.

बहिणाबाईला शाळेत जाता आल नाही. तेव्हा मुलीना फार कुणी शिकवत नव्हते. त्यातल्या त्यात बहिणाबाई यांना घनश्याम, गणपत व धनाजी तसेच तुयसा, सिता व अहिल्या तिन बहिणी व तिन भाऊ असल्यामुळे बहिणाबाईला शाळेत जाता आल नाही. त्यामुळे त्यांना लिहिता वाचता येत नव्हत. त्यांच्या माहेरी हमेशा कचेरी भरे कारण उखाजी महाजन हे समाजाचे मार्गदर्शक असल्यामुळे अनेक जीवनात लोकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्याचे कार्य त्यांचे वडिल करत होते. न्यायदान करण्याच कार्ये त्यांच्या घरी चालत असे. त्यामुळे सदा घरी अबादी अबाद असल्याचे जाणवत होते.

गावांमधी दबदबा बाप महाजन माझा
त्याचा काटेतोल न्याव जसा गावामधी राजा ।।

असे म्हटल्या जात होते. त्याच प्रमाणे

" माय भिमाई माऊली जशी आंब्याची साऊली
आम्हाला केल गार, सोता उन्हात तावली।।"

असा भाव आईमधुन दिसून येते.

भाऊ घमा गाये घाम, गना भगत गनात
घना माझा लिखणार गेला शिक्याले धुयात

अस वर्णन बहिणाबाई करतात. बहिणी मात्र आशीलाच्या घरी दिल्या त्या सुखात आहे.

सासरी नांदत असतांनी पती तसा मनमिळावुच होता. बहिणाबाईला सोपान देव सारखा कवी मुलगा होता. तो प्राध्यापक झाला. ओंकार नावाचा दुसरा मुलगा तर काशी नावची मुलगी होती. बहिणाबाईच खटल्याच घर होत. पण कालांतरान घराची विभागणी झाली घराची सर्व जबाबदारी बहिणाबाई वर आली.

"ऐका संसार संसार दोन्ही जीवचा इचार
देतो दुःखाला होकार अन् सुखाले नकार "

जीवन हे सुखदुःखानी बनलेल आहे हे बहिणाबाई स्पष्टच करतात. संसाराचे काही वर्षच गेल्यावर पती निधन होते. तेव्हा बहिणाबाई म्हणतात

देव गेले देवाघरी अठी ठेवीसनी ठेवा
डोयापुढे दोन लाल रडु नको माहया जीवा

बहिणाबाई स्वताला आवरते व म्हणते मन बळकट करुन म्हणते.

जरी फुटल्या बांगळ्या मनगटी करतूत
तुटे मंगयसूतर उरे गयाची शपथ

मनाला आवर घालून आपण आपल्या प्रपंचासाठी झटल पाहिजे. हा भाव व्यक्त करुन स्वताच्या मनाला पक्क बनवते. व पुढील वाटचाल करते. बहिणाबाई ही शेती करते. त्यामुळे जीवनात अपार कष्ट सहन करण्याची जीदृद ती मनात बाळगते. जगतांना बहिणाबाई अनेक प्रसंगातुन जाते. तेव्हा शेतातील अनुभव घेत असतांना पेरणी, कोळपणी, निंदणी, कापणी, मळणी उपननी यातून जाव लागते.

अस मार्मिक वर्णन बहिणाबाई करतात. शेतात कष्ट करुन जीव शिणतो म्हणूनच ईश्वरानं सण वार यांची निर्मिती केलेली दिसते. काही सणांचा विचार बहिणाबाई करतात गुढी उभारणी या काव्यातून बहिणाबाई म्हणतात

गुढी पाडव्याचा सन, आता उभारा रे गुढी
नव्या वरसाचं देन, सोडा मनातली आढी
गेलं साली गेली आढी आता पाडवा पाडव
तुम्ही येरांयेरांवरी लोभ वाढवा वाढवा। [३]

जूऱ्या वर्षातील भानगडी सोडून नव्यान गुढी उभारा अन् सर्व लोकांवर प्रेम करा. सौजन्य साधा. तसेच पोळा पोया या सनाबाबत बहिणाबाई म्हणतात,

"आला आला शेतकऱ्याचा, पोयाचा रे सन मोठा
हाती घेईसन वाटया आता शेंदूराले घोटा
लावा शेंदूर शिंगाले, शेंब्या घुंगराच्या लावा
गयामधी बांधा जीला घंट्या घुंगरू मिरवा। " ४

आखजी 'अक्षयतृतीया'

आखंजीचा आखंजीचा, मोलाचा सन देखाजी
निंबावरी निंबावरी, बांधावा छान झोकाजी
माझा झोका माझा झोका चालला भिरभिरी जी
माझा झोका माझा झोका खेयतो वाऱ्यावरी जी

निंबाच्या झाडावर झोका बांधून आखजीच्या दिवशीचा आनंदोत्सव साजरा करण्याच कसब बहिणाबाईत होत. त्याचप्रमाणे माहेर सासर संदर्भातही त्यांच सुक्ष्म अवलोकन त्यांच्या काव्यातुन दिसुन येते. त्या प्रसंगात बहिणाबाई पेरनी करतांना म्हणतात.

पेरनी पेरनी आले पावसाचे वारे
बोलला पोपया पेर्ते व्हारे पेर्ते व्हारे
पेरनी पेरनी आला धर्तीचा वास
वाढे पेरनीची शेतकऱ्या, तुझी आस.

अशी पेरनी होते नंतर

बी टरारे भुईत सर्वे कोंब आली वऱ्हे
गयव्हरल शेत जसं अंगावरती शहारे

संपूर्ण शेत हे हिरवगार झाल शेत बहरल त्यानंतर पीक पीवळ होते व कापणीला योत तेव्हा बहिणाबाई म्हणतात

पिक पिवये पिवये आली कापणी कापणी
हातामधी धरा इय्ये , खाले ठेवा रे इय्ये

पुढील प्रक्रिया ही रगडणीची असते. तेव्हा बहिणाबाई म्हणतात

आता चाल चाल बैला पात चाले गरगर
तसे कनुसामधून दाने येती भरभर
त्यानंतर उपननी येते तेव्हा
चल येरे येरे वारा येरे मारोतीच्या बापा
नको देऊ गुंगारा पुऱ्या झाल्या तुझ्या थापा.।५

या सर्वच शेतीच्या बाबतीत जसा मोसम त्याप्रमाणे सर्व रचना बहिणाबाई आपल्या काव्यात करत असते. बहिणाबाई यांच सुक्ष्म निरीक्षण आहे. निसर्गकन्या म्हणुनही काही लोक त्यांना संबोधतात. निसर्गात वावरत असतांना त्या खोप्यामधी खोपा या कवितेत म्हणतात

अरे खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिंन, झोका झाडाले टांगला.
पिल निजली खोप्यात, जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव, जीव झाडाला टांगला. । ६

अस अप्रतीम काव्य बहिणाबाईनी केल म्हणूनच बहिणाबाईला निसर्गकन्या म्हणतात. बहिणाबाई दैनंदिनी जीवनात 'घरोटा' जात्याच वर्णन करतात. दररोज घरात दळण दळतांना मोठ्या पहाटे उठून जात चालवाव लागे म्हणुन त्या म्हणतात

चल घटोटा घटोटा, तुझी चाले घरघर
तुझ्या घरघरीतून, पीठ गये भरभर
अरे घरोटा घरोटा, घास माझा जवारीचा
तुले सनासुदी गहू, कधी देते बाजरीचा

अशाप्रकारे कधी गहू कधी बाजरी तर हमेशा ज्वारी दळावी लागे .तेव्हा चूल पेटे . संसाराबद्दल बहिणाबाई म्हणतात

अरे संसार संसार जसा तवा चुल्हयावर
आधी हाताला चटके तवा मियते भाकर
अरे संसार खोटा कधी म्हणु नाही
राऊळाच्या कयसाले लोटा कधी म्हणु नाही.

अस निरीक्षण बहिणाबाईच होत. अनुभवाच भांडार त्यांच्या जवळ होत. मनाला मोहुन टाकणारी काव्यरचना त्यांच्याजवळ होती. येवढी विलक्षण काव्यरचना त्या का करत तर असा प्रश्न सर्वांनाच पडन साहजिकच आहे. त्यावर त्या अस म्हणत

माझी माय सरसोती, माले शिकवते बोली,
लेक बहिणाच्या मनी, किती गूपित पेरली

मला सरसोती मायच सार शिकवत असते. बहिणाच्या मनात अस गुपित पेरणी केली की कधी कशाचीच कमी नाही एवढा शब्दांचा साठा बहिणाबाईला सरसोती मायन दिला आहे. 'माहेर' संदर्भात बहिणाबाई अस म्हणतात

तुझे भाऊ देवाघरी, नही मायबाप तुले
तुले कशाच माहेर , लागे कुलूप दाराले ।।

जोपर्यंत माहेरची माणस आहे तोपर्यंतच माहेर आहे.

ते सर्व देवाघरी जातात तेव्हा बहिणाबाई सांगते. तुझे माय बाप भाऊ देवाघरी गेले . घराला कूलूप लागल. आता कशाच माहेर अन कशाचे काय ?

माहेरुन ये निरोप, सांगे कानामधी वारा
माझ्या माहेराच्या खेपा, लौकी नदीला विचारा

लग्नापासून तर आतापर्यंत सासरहून माहेरी किती वेळा बहिणाबाई आल्या याची नोंद कुणाकडे असेल तर ते लौकी नदीलाच माहित आहे.

माहेरच्या वारीबद्दल त्या अस म्हणतात
आज माहेराले जानं झाली झाली ओ पहाट
आली आली डोयापुढे माझ्या माहेरची वाट

असा खुलासाही त्या करतात. पुढे त्या अस म्हणतात.

माझ्या माहेराच्या वाटे, डाबा पाण्याच्या लागल्या
म्हशी बासल्या पाण्यात, जशा वरमाई न्हाल्या

अशी उत्तुंग काव्यरचना बहिणाबाईची होती. अशा अनेक विषयावर बहिणबाईचा विचार अगदी आचार्यचकीत करणार पाहायला मिळतो. बहिणाबाईच जीवनच शेतीची काम करतांना गेले अतिशय कष्टमय जीवन त्यांनी जगल पण कधी हार मानली नाही. येणा-या प्रत्येक प्रसंगाला तोंड देण्याच धाडस त्यांच्या जीवनातून दिसून येते. व भुतो न भविष्यती अशी जादु त्यांच्या काव्यात होती शेवटी बहिणाबाई यांनी देवाकडे जाण्याच ठरविल. काळ आला आणि जीव गेला.

जीव देवान धाडला जन्म म्हणे आला आला
जव्हा आल बोलावनं मौत म्हणे गेला गेला

अशा स्वरुपातच बहिणाबाई यांची प्राणज्योत दि ३.१२.१९५१ ला मावळली.

## संदर्भ ग्रंथ

१. ‘बहिणाबाईची गाणी’ ‘माहेर’ पृ. क्र. ११४, सुचित्रा प्रकाशन मुंबई
२. ‘बहिणाबाईची गाणी’ ‘संसार’ पृ. क्र. २२ प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव
३. ‘बहिणाबाईची गाणी’ ‘गुढी उभारणी’ पृ. क्र. ६६ प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव
४. ‘बहिणाबाईची गाणी’ ‘पोया पोळा’ पृ. क्र. १५५ सुचित्रा प्रकाशन मुंबई
५. ‘बहिणाबाईची गाणी’ ‘उपननी’ पृ. क्र. १४५ सुचित्रा प्रकाशन मुंबई
६. ‘बहिणाबाईची गाणी’ ‘खोप्यामधी खोपा’ पृ. क्र. ३१ प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव
७. ‘बहिणाबाईची गाणी’ ‘माहेर’ पृ. क्र. ३८ प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव